पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या कार्यक्रमात ५८ आणि ५९ वा राज्य मराठी चित्रपट पुरस्कार यंदा एकाच वेळी प्रदान केले जाणार आहेत. त्याचबरोबर २०२३ चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, राज कपूर जीवनगौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येतील.

****

मराठ्यांनी राज्यात सुरू केलेली आरक्षणाची लढाई ही वर्चस्ववादाची असल्याची टीका, मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य ओबीसी आरक्षण आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यातल्या भोकर इथं आज ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात ते बोलत होते. २००४ साली बांटिया आयोगाने राज्यात ओबीसींची संख्या कमी झाल्याचा अहवाल दिला आहे. तो अहवाल कोणत्या आधारे दिला याचा शोध घेणे गरजेचं आहे, त्यामुळे आता ओबीसींना आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी लढावं लागणार असल्याचं ते म्हणाले. या मेळाव्यापूर्वी उमरी चौक येथून पारंपारिक वेशात भव्य रॅली काढण्यात आली.

****

बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा राखी पौर्णिमेचा सण उद्या साजरा होत आहे. यानिमित्त पालघर जिल्ह्यात विक्रमगड तालुक्यातल्या महिला पर्यावरण पूरक अशा बांबूच्या राख्या बनवण्यावर भर देत आहेत. यंदा या महिलांनी तयार केलेल्या राख्या भारतीय सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांच्या हातावर झळकणार आहेत.

****

केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा आज नंदुरबार जिल्ह्यात शहादा तालुक्याच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला. शहरातून बाईक रॅली काढून नंतर त्यांचं पटेल समाजातर्फे भव्य स्वागत करण्यात आलं.

****

रत्नागिरीत संरक्षण उत्पादन निर्मिती कंपनीसाठी उद्योग विभाग आणि निबे कंपनी यांच्यात एक हजार कोटी रुपयांचा करार आज करण्यात आला. राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे सुमारे एक ते दीड हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. या वेळी संरक्षणविषयक उत्पादनं, शस्त्रास्त्रं यांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. तसंच, संरक्षण क्षेत्रातल्या रोजगारसंधींची माहिती देणाऱ्या व्याख्यानांचं आयोजनही करण्यात आलं होतं.

****

कोलकाता इथं महिला डॉक्टरवर अत्याचार आणि हत्या प्रकरणातल्या दोषींना फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ इथं निषेध रॅली काढण्यात आली. बॅरिस्टर नाथ पै शिक्षण संस्था आणि विविध डॉक्टर्स संघटनांच्या माध्यमातून कुडाळ पोलीस ठाण्यावर निषेध रॅली काढण्यात आली. दोषींना फाशीची शिक्षा दिली नाही आणि डॉक्टरांवरचे हल्ले असेच सुरु राहिले, तर काम बंद करण्याचा इशारा डॉक्टर्स आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिला आहे.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्यामध्ये ब्रिटिश खगोल शास्त्रज्ञ सर नॉर्मन लॉकियर यांनी १८ ऑगस्ट १८६८ रोजी हेलियम वायूचा शोध लावला होता. त्या घटनेला आज १५६ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सिंधुरत्न कार्यकारी समिती आणि विजयदुर्ग ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने विजयदुर्ग किल्ल्यावर हेलियम दिन साजरा करण्यात आला. विजयदुर्ग एस.टी. आगार ते विजयदुर्ग किल्ला भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

****

जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त कलर्स ऑफ छत्रपती संभाजीनगर ह्या हौशी फोटोग्राफर समूहातर्फे उद्या शहरातल्या सिद्धार्थ उद्यानात छायाचित्रांचं प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. सकाळी सात ते दहा या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं असल्याचं आयोजकांनी कळवलं आहे.

****

राज्यात मराठवाड्यासह, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी आज विजा आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं वर्तवला आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात दुपारनंतर काही काळ जोरदार पाऊस झाला.

दरम्यान, येत्या दोन-तीन दिवसांत पश्चिम बंगालसह हिमालयाशी जोडलेला भाग ईशान्येकडील राज्ये तसंच केरळ, तामिळनाडू आणि लक्षद्वीपमध्येही तीव्र स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****